गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २३६ वा ● सोमवार १५ जानेवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 236 | Date : 15/01/2024 | blow :Monday | Page 4 | Price 4



## सिद्धेश्वर यात्रेत लाखो भाविकांच्या साक्षीने 'अक्षता सोहळा' संपन्न

### ✻ अक्षता सोहळ्यास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उपस्थित राहून श्री सिद्धेश्वर यांचे दर्शन घेतले ✻ श्री गुरु श्री सिद्धेश्वरमय्या महाराज की जय....या जयघोषानी संपूर्ण परिसर दुमदुमला

सोलापूर : ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर यात्रेत दुसऱ्या दिवशी सिद्धेश्र्वर तलावाकाठी संमती कट्ट्यावर अक्षता सोहळा संपन्न झाला. लक्षावधी नेत्रांचे पारणे फेडणाऱ्या या अक्षता सोहळयासाठी पांढराशुभ्र बाराबंदीचा पारंपारिक पोशाख परिधान करून आलेल्या भाविकांची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली.

तब्बल नऊशे वर्षांची मोठी परंपरा लाभलेल्या श्री सिद्धेश्र्वर यात्रेत साक्षात त्यांच्या विवाह सोहळ्यावर प्रतिकात्मक विधी पूर्ण केले जातात. श्री सिद्धेश्र्वर महाराजांची भक्ती करणाऱ्या एका कुंभारकन्येने त्यांच्याशी विवाह करण्याचा हट्ट केला असता सिद्धेश्र्वर महाराजांनी आपल्या योगदंडाशी विवाह करण्यास संमती दिली होती. त्यानुसार कुंभारकन्येचा सिद्धेश्र्वर महाराजांच्या योगदंडाशी विवाह झाला. यात्रेतील उंच नंदिध्वज हे सिद्धेश्र्वर महाराजांच्या योगदंडाचे प्रतीक मानले जातात. मानाचे हे सात नंदिध्वज सिद्धेश्र्वर देवस्थान समितीच्या मालकीचे असले तरी त्यांचा मान विविध जातींना देण्यात आला आहे. पहिल्या नंदिध्वजाचे मानकरी हिरेहब्बू कुटुंबीय तर दुसऱ्या नंदिध्वजाचा मान देशमुखांचा आहे. तिसरा लिंगायत-माळी समाजाचा, चौथा आणि पाचवा विश्र्वब्राह्मण समाजाचा आणि सहावा आणि सातवा मान मातंग समाजाचा आहे. हे नंदिध्वज सामाजिक समतेचे प्रतीक समजले जातात.

सकाळी उत्तर कसब्यातील हिरेहब्बू वाड्यातून नंदिध्वजांची वाजतगाजत मिरवणूक निघाली. अग्रभागी सनई-चौघडा होता. हलग्यांचे पथक, संगीत ब्रास बँड पथके, नाशिक ढोल, तुतारी अशा विविध वाद्यांनी मिरवणुकीचा मार्ग दुमदुमून गेला होता. मार्गावर लाखो भाविकांनी नंदिध्वजांचे पूजन केले. नंदिध्वजांना नवरदेवाप्रमाणे बाशिंग बांधण्यात आले होते. हा मिरवणूक सोहळा म्हणजे ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर महाराजांच्या प्रतिकात्मक लग्नाच्या वरातीचा सोहळा होता.

तीन किलोमीटर अंतराच्या मिरवणूक मार्गावर 'संस्कारभारती'च्या कलावंत कार्यकर्त्यांनी रांगोळी रेखाटली होती. यंदा रांगोळीवर अयोध्येतील । पान २ वर

### आज होमविधी

शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यात्रेच्या तिसऱ्या दिवशी उद्या (सोमवारी) रात्री दहा वाजता होम मैदानावरील होमकट्ट्यावर होमविधीचा धार्मिक सोहळा पार पडणार आहे. त्यासाठी सायंकाळी पाच वाजता नंदीध्वजांची सवाद्य मिरवणूक होम कट्ट्याकडे निघणार आहेत. रात्री अकरा वाजता भगिनी समाजजवळ वासराची भाकणूक होणार आहे.



### पालकमंत्री यांच्याकडून श्री सिद्धेश्वर यांचे दर्शन

अक्षता सोहळा पार पडल्यानंतर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी श्री सिध्देश्र्वर महाराज यांचे दर्शन घेतले. त्यानंतर देवस्थान समितीच्या वतीने पालकमंत्री यांचा श्री सिद्धेश्र्वर यांची प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले. यात्रा समितीचे प्रमुख महादपा चकोते यांनी यात्रा यशस्वी होण्यासाठी पालकमंत्री व जिल्हा प्रशासन देत असलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा ही सत्कार करण्यात आला.

## काँग्रेसच्या भारत जोडो न्याय यात्रेला मणिपूरमधून सुरुवात

### ६७ दिवस, ३५५ लोकसभा मतदारसंघात राहुल गांधींचा दौरा



मुंबई : राहुल गांधींच्या नेतृत्वामध्ये काँग्रेसच्या भारत जोडो न्याय यात्रेची मणिपूरमधून सुरुवात झाली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मणिपूरमधील थौबल जिल्ह्यात या यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी दिल्लीतून काँग्रेस नेत्यांचे विशेष विमान रवाना मणिपूरच्या दिशेने रवाना झाले होते. यामध्ये सलमान खुर्शीद, राजीव शुक्ला, आनंद शर्मा, रणदीप सिंह सुरजेवाला, अशोक गहलोत, अभिषेक मनु सिंघवी, भूपेंद्र सिंह हुड्डा, सचिन पायलट, दिग्विजय सिंह, प्रमोद तिवारी यांच्यासह जवळपास ७० काँग्रेसचे नेते राहुल गांधींसह मणिपूरमधील इंफाळ येथे पोहचले.

मणिपूरपासून सुरू झालेली काँग्रेसची ही यात्रा ६७१२ किलोमीटरचा प्रवास करुन २० मार्चला मुंबईत संपणार आहे. यावेळी राहुल गांधी ६०-७० काँग्रेस नेत्यांसह बसने हे अंतर पार करतील. महत्त्वाच्या ठिकाणी पायी प्रवास करण्यात येणार आहे. राहुल गांधींच्या 'भारत जोडो यात्रे'चा हा दुसरा भाग आहे. दरम्यान पहिल्या टप्प्यात कन्याकुमारी ते काश्मीर असा प्रवास करण्यात आला होता. त्यावेळी ३५०० किलोमीटरची 'भारत जोडो यात्रा' १२ राज्यांमधून गेली. त्याचबरोबर 'भारत जोडो न्याय यात्रा' १५ राज्यांचा समावेश करणार आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीत राहुल गांधींच्या भारत जोडो न्याय यात्रेचा सकारात्मक परिणाम होणार असल्याचं म्हटलं जातं आहे. । पान २ वर

## शिवसेना, राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणावर १६ जानेवारीला सुनावणी होण्याची शक्यता

### राहुल नार्वेकरांच्या निकालानंतर सुप्रीम कोर्टात

नवी दिल्ली : राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर निकाल दिल्यानंतर पहिल्यांदाच सुप्रीम कोर्टात आमदार अपात्रतेच्या प्रकरणावर सुनावणी होण्याची शक्यता आहे. ही सुनावणी १६ जानेवारी रोजी होण्याची शक्यता असल्याची माहिती देण्यात आलीये. पण ही राहुल नार्वेकर यांच्या निकालानंतर ठाकरे गटाकडून दाखल करण्यात आलेली नवी याचिका नाही. सर्वोच्च न्यायालयात शिवसेना आणि राष्ट्रवादी अशी एकत्रित आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी सुरु आहे. त्याचसंदर्भातली ही सुनावणी असणार आहे.

राहुल नार्वेकर यांनी कोणालाही अपात्र न करता शिवसेना हा पक्ष शिंदेंना दिला. त्यानंतर ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याची भूमिका जाहीर करण्यात आली. पण अद्याप राहुल नार्वेकरांच्या निकालाला आव्हान देणारी याचिका ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली नाहीये. त्यामुळे जर १६ जानेवारी रोजी सुनावणी झाली तर ही सुनावणी शिवसेना आणि राष्ट्रवादी यांची एकत्रित आमदार अपात्रतेच्या प्रकरणावर होईल.

एकनाथ शिंदे यांचीच खरी शिवसेना असल्याचा निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला. त्याचसोबत, शिंदे गटाच्या भरत गोगावले यांचा व्हिप अधिकृत ठरवत ठाकरे गटाच्या सुनील प्रभू यांचा व्हिप विधानसभा अध्यक्षांनी अवैध ठरवलाय. त्यामुळे या निकालात उद्धव ठाकरे । पान २ वर

## पुढील ३ दिवस थंडीची लाट!

### हवामान खात्याने वर्तवला अंदाज

नवी दिल्ली : देशात आता थंडीचा पारा आणखी घसरणार आहे. पुढील काही दिवसात देशातील तापमानात घट होताना पाहायला मिळणार आहे. भारतीय हवामान विभागान वर्तवलेल्या अंदाजानुसार, पुढील तीन दिवस उत्तरेकडे थंडीची लाट पाहायला मिळणार आहे. पुढील काही दिवस उत्तरेकडील भागात थंडीतून दिलासा मिळण्याची शक्यता नाही. दिल्ली, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा भागात दाट धुक्याची चादर पसरली आहे. पहाटेच्या वेळेस दाट धुके आणि गारठ्यामुळे सकाळी घरातून बाहेर पडणं कठीण झालं आहे.



मध्य आणि पूर्व भारतात पुढील ४८ तासात तापमानात घट होणार आहे. पुढील दोन दिवसात मध्य आणि पूर्व भारतातील तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसची घट होणार असल्याचं आयएमडीने म्हटलं आहे. राजस्थान, दिल्लीमध्ये थंडीची स्थिती कायम राहणार असल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे. १६ जानेवारीपर्यंत नवीन वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय होण्याची शक्यता आहे, त्यामुळे देशातील हवामानात पुन्हा एकदा बदल पाहायला मिळण्याचा अंदाज आयएमडीने वर्तवला आहे.

आज उत्तरेकडील राज्य पंजाब, । पान २ वर

## सामाजिक कार्यात पुढे राहणाऱ्या संस्थांचा महाराष्ट्राला समृद्ध वारसा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




मुंबई : सामाजिक कार्यात पुढे राहणाऱ्या संस्थाचा महाराष्ट्राला समृद्ध वारसा लाभला आहे. या संस्थांनी नेहमीच सर्वच जाती-धर्मांचं हित पाहिले आहे. लोकाभिमुख कामांमध्ये या संस्थांनी केलेले काम अतुलनीय आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कुणबी समाजोन्नती संघाच्यावतीने मुलुंड येथे उभारण्यात आलेले हे देखणे वसतीगृह असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

कुणबी समाजोन्नती संघाच्या वतीने मुलुंड (पूर्व) येथे उभारण्यात आलेल्या कुणबी विद्यार्थी वसतिगृहाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार सुनील तटकरे, खासदार मनोज कोटक, कुणबी समाजोन्नती संघाचे अध्यक्ष भूषण बरे यांच्यासह संघाचे मान्यवर पदाधिकारी व नगरिक उपस्थित होते.

उद्या मकर संक्रांतीचा सण साजरा होत आहे. मकर संक्रातीच्या पूर्व संध्येला अशा या समाजाभिमुख कार्यक्रमास उपस्थित राहता आले हा आपल्यासाठी आनंदाचा क्षण आहे, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आजचा दिवस व हा क्षणही आपल्या सर्वांसाठी गोड आणि समाधानाचा आहे. समाजोन्नती संघांनी एक मोठी मजल मारली आहे. आपला हा वसतीगृहाचा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण केला आहे. त्यासाठी कष्ट घेणाऱ्या सर्वांचे आपण या प्रसंगी अभिनंदन करतो. समाजाच्या योगदानातून समाजोपयोगी तेही शिक्षणाच्या क्षेत्रात असं भरीव काम होणं हे आपल्या महाराष्ट्राचं वैशिष्ट्य आहे. त्यासाठी । पान २ वर



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### राजकीय निकाल...

राहुल नार्वेकर यांनी अलीकडेच राज्यातील सत्ता संघर्षावर अंतिम निवाडा केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्यासह वेगळी वाट निवडणारे सर्व आमदार थेट अपात्र ठरविण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला होता. संबंधित आमदारांच्या पात्रतेसंदर्भात विधानसभेच्या अध्यक्षांनी निर्णय करेपर्यंत सभागृहातील त्यांचे लोकप्रतिनिधी या नात्याने अधिकार कायम राहणार होते. जर तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंनी आपल्या पदाचा स्वतःहून राजीनामा दिला नसता तर आम्ही पूर्वस्थिती आणण्याबाबत विचार करू शकलो असतो, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. त्याचा अर्थ उध्दव यांनी राजीनामा दिला नसता तर सर्वोच्च न्यायालयाने ठाकरेंनाच पुनः मुख्यमंत्रिपदी स्थानापन्न केले असते, असेही समजण्याचे काही कारण नाही. आम्ही त्याबाबत विचार केला असता; म्हणजेच त्या मुद्द्यावर खल झाला असता, इतकेच न्यायालयाला म्हणायचे होते. त्यातून न्यायालयाने नेमका निर्णय काय केला असता याविषयी कोणताही ठोस अंदाज लावणे चुकीचे ठरेल. राज्यपालांनी बोलावलेली बहुमत चाचणी झालीच नाही, त्यामुळे जी घटना घडलीच नाही, त्याविषयी विचार करणे न्यायालयाला शक्य नाही, हेच निकालपत्राने वेगळ्या शब्दात मांडले आहे. ज्या घटना घडलेल्या नाहीत ती चूक की बरोबर, हे ठरवणे कोणत्याही न्यायालयाला न्यायनीतितत्त्व शास्त्रानुसार शक्यच नसते. उध्दव यांच्या सरकारची बहुमत चाचणी झालीच नव्हती त्यामुळे परिस्थिती पूर्ववत करण्याबाबत न्यायालय विचार करू शकत नाही, असे निकालपत्रात लिहिले होते. त्याचा अर्थ ठाकरेंनी राजीनामा दिला नसता तर न्यायालयाने त्यांना पुन्हा मुख्यमंत्री केले असते, असा काढणे सपशेल चुकीचे ठरेल. त्याउपरही बहुमत चाचणीला सामोरे गेल्यावर ठाकरेंच्या बाजूने महाविकास आघाडीचे सर्व आमदार उभे राहणार होते का, हा प्रश्नही तपासून पाहायला हवा. नार्वेकर यांच्या विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडीवेळेस शिंदे यांच्या बहुमत चाचणीच्या वेळी काँग्रेसचेच काही आमदार उशिरा पोहचले होते, हे विसरून कसे चालेल. बहुमत चाचणीला सामोरे जाण्याची परिस्थिती तत्कालीन राज्यपालांच्या आदेशामुळे निर्माण झाली, हे खरे असले तरीही ठाकरेंच्या बहुमताची चाचणी सभागृहातच झाली असती. एखाद्या आमदाराच्या अपात्रतेविषयी केल्या जाणाऱ्या निर्णयाचा त्यांनी त्यापूर्वी सभागृहात केलेल्या मतदानावर अथवा घेतलेल्या भूमिकेवर कोणताही परिणाम होत नाही, हे तत्त्व संविधानात अंतर्भूत आहे व न्यायालयाने निकालपत्रात त्याचा उल्लेखदेखील केला आहेच.

## औद्योगिक गुंतवणूकदारांचे आवडते ठिकाण 'महाराष्ट्र'

भारत पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होण्याच्या उंबरठ्यावर आहे आणि महाराष्ट्राने एक ट्रिलियन डॉलर्सचा वाटा देण्याचे ठरवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकताना, सकल देशांतर्गत उत्पन्नात राज्याचा वाटा १४.२ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत नेण्याची वचनबद्धता राज्याने अधोरेखित केली आहे. देशाच्या 'विकासाचे ग्रोथ इंजीन' म्हणवणा-या महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या जमेची बाजू दाओस येथे होणा-या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेच्या पार्श्र्वभूमीवर विचारात घेणेही महत्वाचे आहे.

जगभरातील उद्योग क्षेत्रासाठी महाराष्ट्राची भूमी सुपिक आहे. व्यवसायासाठी अनुकूल वातावरण, उत्तम पायाभूत सुविधा, तरुण, कुशल आणि उच्च शिक्षीत मनुष्यबळाची राजधानी, मजबूत कनेक्टिव्हिटी, ग्राहकांची उच्च मागणी, प्रोत्साहन आणि अनुदान यामुळे राज्य औद्योगिक गुंतवणुकीसाठी अव्वल पसंतीचे ठिकाण ठरत आहे. मोटार वाहने आणि ऑटोमोबाईल घटक, इलेक्ट्रॉनिक प्रणाली संरचना आणि उत्पादन, रत्ने आणि आभुषणे, माहिती तंत्रज्ञान आणि त्यावर आधारित सेवा, औषधनिर्मिती आणि रसायने, अभियांत्रिकी, वस्त्रोद्योग, खाद्यान्न प्रक्रिया, आणि इतर संबंधित क्षेत्रांसह महाराष्ट्राने आपल्या गुंतवणूक अनुकूल धोरणांमुळे उद्योगांना आकर्षित केले आहे. उल्लेखनीय म्हणजे, सन २०१६ पासून २८९८ पेक्षा अधिक सामंजस्य करार झाले आहेत. मागील वर्षी २०२३ मध्ये दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत १९ सामंजस्य करार करून १ लक्ष ३७ हजार ६६६ कोटी रूपयांची गुंतवणूक राज्याने आणली आहे. त्यातील ८५ टक्के उद्योगांना राज्य शासनाने जमीन आणि इतर सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच ११.८ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून त्यातून २० लाखांहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल. मागील सहा महिन्यात देशातील सर्वात जास्त थेट परकीय गुंतवणूक राज्यात आली आहे आणि ती गुजरात, कर्नाटक आणि दिल्ली या तीन राज्यांच्या एकत्रित गुंतवणूकीपेक्षा जास्त आहे.महाराष्ट्राने औद्योगिक उद्याने, माहिती तंत्रज्ञान पार्क, लॉजिस्टिक पार्क, मेगा टेक्सटाईल हब, स्मार्ट औद्योगिक शहरे, प्लग अँड प्ले इन्फ्रास्ट्रक्चर, औद्योगिक समूहांसाठी दळणवळण सुविधा आणि स्टार्टअपसाठी इनक्यूबेटर केंद्रे विकसित केली आहेत. उद्योगांसाठी वरदान ठरणाऱ्या विविध सुविधाही राज्य सरकारने दिल्या आहेत. यामध्ये व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या परवान्यांची संख्या कमी करणे, गुंतवणूकदारांसाठी एक खिडकी सुविधा केंद्र अशा सुविधांचा समावेश आहे.

**ऑनलाइन वन स्टॉप शॉप– मैत्री** राज्यात गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि व्यवसाय-भागीदारी सुलभ करण्यासाठी, राज्यशासनाने ऑनलाइन वन स्टॉप शॉप – महाराष्ट्र इंडस्ट्री ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटेशन (मैत्री) प्रणाली सुरू केली आहे. सध्याच्या आणि संभाव्य गुंतवणूकदारांना गुंतवणूक प्रक्रियेशी संबंधित सर्वसमावेशक माहिती आणि सेवा प्रदान करण्यासाठी 'मैत्री' सुविधा सेल 'क्लिअरिंग हाऊस' म्हणून काम करीत आहे . राज्य शासनाने हा कायदाही केला आहे. राज्य सरकारने सर्व थेट विदेशी गुंतवणूक (FDI) प्रस्ताव आणि ५० कोटी किंवा त्याहून अधिक रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या नवीन युनिट्ससाठी मैत्री सेलद्वारे एकल परमिट प्रणाली 'महापरवाना' सुरू केली आहे. १५ विविध विभागांमार्फत ११९ विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मैत्री सेलच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या एकूण २.७८ लाखांपैकी २.६९ लाख अर्ज निकाली काढण्यात आले. सेलने ३९४५ पैकी ३९०५ तक्रारींचे निवारण केले आहे.

**महाराष्ट्राची भरभराट होत असलेली अर्थव्यवस्था** महाराष्ट्र हे भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य आहे. सन २०२३-२४ मध्ये ४९० अब्ज डॉलर सकल राज्य देशांतर्गत उत्पादनासह अग्रेसर आहे. महाराष्ट्राच्या भक्कम अर्थव्यवस्थेचे रहस्य पायाभूत सुविधांसोबतच वाढत्या डिजिटलायझेशनसह विविध घटकांमध्ये दडलेले आहे. महाराष्ट्रात इंटरनेट ग्राहकांची संख्या ९७ दशलक्ष तर १३३ दशलक्ष दूरसंचार ग्राहक आहेत. शिक्षण क्षेत्राचा विचार केल्यास- महाराष्ट्रात भारतातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालये आहेत. ९९१ पेक्षा जास्त अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयांसोबत ९६६ आयटीआय असलेले हे शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्य आहे. नुकतेच राज्यातील सहा विभागातील महाविद्यालयात १०० कौशल्य विकास केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. दरडोई उत्पन्नामध्ये २,४२,२४७ रुपये इतके दरडोई उत्पन्नासह देशातील अग्रेसर असलेले राज्य आहे.

**निर्यात आणि पायाभूत सुविधा** राष्ट्रीय निर्यातीपैकी २० टक्क्यांहून अधिक निर्यातीचा वाटा राज्याचा आहे. त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. येथे पाच आंतरराष्ट्रीय आणि १३ देशांतर्गत विमानतळ आहेत, याशिवाय सर्वात लांब रस्ते नेटवर्क, दोन मोठी आणि ५३ छोटी बंदरे आणि सर्वात जास्त वीज निर्मिती क्षमता असलेले राज्य आहे. राज्यातील औद्योगिक परिसंस्थेने क्लस्टर्सच्या वाढीस चालना दिल्यामुळे सर्वसमावेशक एकात्मिक औद्योगिक विकास शक्य झाला आहे. मजबूत औद्योगिक आणि वाहतूक पायाभूत सुविधांमुळे महाराष्ट्रात सर्वच क्षेत्रातील उद्योगांची भरभराट झाली आहे.

**महाराष्ट्राचे निर्यात प्रोत्साहन उपक्रम** निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र निर्यात प्रोत्साहन परिषद, जिल्हा निर्यात प्रोत्साहन परिषद, टास्क फोर्स आणि जिल्हा उद्योग केंद्रे स्थापित केले आहेत. राज्य निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी निर्यात अधिवेशन केंद्रे, 'निर्यात हाट',भागधारकांसोबत आभासी बैठका आयोजित करण्यात येत आहेत. निर्यात केंद्रित घटकांना राज्यस्तरीय उद्योग पुरस्काराने प्रोत्साहित केले जात आहेत. भारत सरकारच्या नीती आयोगाच्या निर्यात तयारी अहवालात म्हटले आहे- आयटी, वस्त्रोद्योग आणि ऑटोमोबाईल घटक यांसारख्या क्षेत्रांसाठी निर्यात प्रोत्साहन केंद्रे मजबूत करून महाराष्ट्राने पहिल्या पाच निर्यातदार राज्यांमध्ये सातत्याने अव्वल स्थान मिळवले आहे. महाराष्ट्राने नियोजनपूर्वक व्यवस्थापन करुन किनारपट्टीवरील बंदर पायाभूत सुविधा विकास आणि विस्तार केला आहे. ५० लहान आणि २ मोठ्या बंदरांसह, महाराष्ट्रामध्ये देशातील सर्वात जास्त बंदरे आहेत. अशा पद्धतीने निर्यातभिमुख परिसंस्था स्थापन करण्यासाठी राज्य सरकारने केलेल्या जाणीवपूर्वक प्रयत्नांमुळे निर्यातीवर लक्षणीय सकारात्मक परिणाम झाला आहे.

**क्रिटिकल औद्योगिक पायाभूत सुविधा निधी (CIIF)** राज्य शासनाकडून क्रिटिकल औद्योगिक पायाभूत सुविधा निधीमध्ये एक हजार कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. औद्योगिक पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी हा अतिरिक्त निधी देण्यात आला आहे. स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (SIDBI) ला उद्यम भांडवलासाठी सुद्धा निधी उपलब्ध करून देत आहे जेणेकरून निर्यात केंद्रित घटक (EOU's) सुदृढ करण्यात मदत होईल.

**वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२३, दावोस** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उद्योगमंत्री उदय सामंत आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भारतीय शिष्टमंडळाचा एक भाग म्हणून महाराष्ट्राने वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम-२०२३ मध्ये सहभाग घेतला. महाराष्ट्राने आपली आर्थिक, औद्योगिक आणि गुंतवणुकीची ताकद प्रख्यात कॉर्पोरेशन्स आणि सरकारी संस्थांच्या जागतिक मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर प्रभावीपणे दाखवली. राज्याचे शिष्टमंडळ विविध व्यावसायिक गुंतवणूक आणि द्विपक्षीय बैठकांमध्ये सक्रियपणे गुंतले होते, परिणामी महाराष्ट्रात एक लाखाहून अधिक नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमता असलेल्या १.३७ लाख कोटी रुपयांच्या १९ गुंतवणुकीच्या उद्देशांवर स्वाक्षरी करण्यात आली.

हा सामंजस्य करार आर्थिक वाढीसाठी वातावरण निर्माण करेल आणि नवीन जगाला आत्मविश्र्वास देईल. महाराष्ट्रातील चंद्रपूर, पुणे, रायगड, रत्नागिरी, छत्रपती संभाजीनगर, गडचिरोली, अहमदनगर आणि इतर काही ठिकाणी कंपन्या स्थापन केल्या जातील. यापूर्वी नमूद केलेल्या कंपन्यांसोबत केलेल्या १९ गुंतवणूक सामंजस्य करारांपैकी सुमारे ८५ टक्के सामंजस्य कराराची अंमलबजावणी झाली आहे आणि उर्वरित लवकरच पूर्ण होत आहे. दाओस येथे १६ ते १९ जानेवारी दरम्यान होणा-या जागतिक अर्थपरिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्राचे शिष्टमंडळ सहभागी होणार आहे. यावर्षी देखील या परिषदेत महाराष्ट्राला भरघोस यश मिळेल याची खात्री आहे.

**– मनीषा सावळे, विभागीय संपर्क अधिकारी , माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

पान १ वरुन

### सिद्धेश्वर यात्रेत लाखो भाविकांच्या

श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा प्रभाव दिसून आला. दुपारी सिद्धेश्र्वर तलावकाठी संमती कट्ट्यावर नंदिध्वज पोहोचले. तेव्हा सिद्धेश्र्वर महाराजांच्या जयजयकाराने वातावरण दुमदुमून गेले होते. सिद्धेश्र्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, यात्रा समितीचे अध्यक्ष महादेव चाकोते, मिरवणूक समितीचे अध्यक्ष ड. मिलिंद थोबडे आदींनी अक्षता सोहळ्याचे नियोजन केले होते. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, त्यांच्या कन्या आमदार प्रणिती शिंदे, तसेच पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार रोहित पवार, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार विजय देशमुख, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार विश्र्वनाथ चाकोते आदी उपस्थित होते. अक्कलकोट संस्थानचे युवराज मालोजीराजे भोसले यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका प्रशासक शीतल तेली-उगले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनीही उपस्थिती लावली होती.संमती कट्ट्यावर नंदिध्वजांचे आगमन होताच परंपरेप्रमाणे सुगडीपूजन झाले. नंदिध्वजांना हळद लावण्यात आली. नंतर अक्षता सोहळ्यास प्रारंभ झाला. स्वतः सिद्धेश्र्वर महाराजांनी कन्नड भाषेत रचलेल्या अक्षता सुहास देशमुख यांनी म्हटल्या. मंगलाष्टकांच्या प्रत्येक चरणांवर भाविकांनी नंदिध्वजांच्या दिशेने अक्षतांचा वर्षाव केला, त्यानंतर सिद्धेश्र्वर महाराजांचा जयजयकार करण्यात आला. अक्षता सोहळ्यानंतर नंदिध्वज पुन्हा ६८ शिवलिंगांना प्रदक्षिणा घालण्यासाठी मार्गस्थ झाले.

### शिवसेना, राष्ट्रवादी आमदार

गटाला मोठा धक्का बसला असून, एकनाथ शिंदे यांना मोठा दिलासा मिळालाय. उद्धव ठाकरेंच्या मनात आलं म्हणून ते एकनाथ शिंदेंची हकालपट्टी करू शकत नसल्याची टिप्पणी राहुल नार्वेकर यांनी केलीय. खरी शिवसेना शिंदेंचीच असल्यामुळे शिंदे गटाचे आमदार पात्र ठरवत, ठाकरे गटाची आमदार अपात्र करण्याबाबतची याचिका फेटाळण्यात आलीय. सोबतच ठाकरे गटाचेही सर्व आमदार पात्र करण्यात आलेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आमदार अपात्र करण्याबाबतच्या दोन्ही गटाच्या याचिका फेटाळत, दोन्ही गटांतील कोणतेही आमदार अपात्र केले नाहीत.

राहुल नार्वेकरांनी शिवसेनेबाबत निर्णय देताना पक्ष संघटनेपेक्षा विधीमंडळातील बहुमताचा विचार केला. त्यामुळे ठाकरे गटाला धक्का तर बसला, पण राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची धाकधूकही वाढली आहे. कारण विधिमंडळातील बहुमत हे सध्या अजित पवार गटाकडे आहे. कारण विधिमंडळातील बहुमत हे सध्या अजित पवार गटाकडे आहे. राष्ट्रवादीच्या पक्ष आणि चिन्हावर अजित पवारांनी दावा केला असून हा वाद केंद्रीय निवडणूक आयोगात पोहोचला आहे. दोन्ही बाजूंकडून त्या संबंधित युक्तिवाद सुरू असून कागदपत्रेही जमा करण्यात आली आहेत. आता निवडणूक आयोग त्यावर काय निर्णय घेतंय हे पाहावं लागेल.

### काँग्रेसच्या भारत जोडो न्याय..

राहुल गांधी हे ६७ दिवसांच्या प्रवासात ११० जिल्ह्यांना भेट देतील. या यात्रेत लोकसभेच्या ३५५ जागांचा समावेश असेल, जे देशातील एकूण संसदीय जागांपैकी ६५% आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने या ३५५ जागांपैकी २३६ जागा जिंकल्या, तर काँग्रेसला केवळ १४ जागा जिंकण्यात यश आले. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमधूनही ही यात्रा जाणार आहे, जिथे काँग्रेसचा नुकताच पराभव झाला आहे.

भारत जोडो न्याया यात्रेचा प्रवास हा मणिपूरमधून सुरु झाला असून पुढे नागालँड, आसाम आणि अरुणाचलसह देशातील १५ राज्यांमधून जाणार आहे. त्यानंतर या यात्रेचा शेवटचा टप्पा हा मुंबई असेल. . ११० जिल्ह्यांतून जाणारी ही यात्रा लोकसभेच्या १०० आणि विधानसभेच्या ३३७ जागांचा समावेश करेल. सुमारे ६७०० किलोमीटरचे अंतर पार करुन मुंबईत या यात्रेचा शेवट होणार आहे. देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मूलभूत प्रश्नांवर 'भारत जोडो न्याय यात्रा' काढण्यात येत असल्याचं काँग्रेसकडून सांगण्यात आलं आहे.

### पुढील ३ दिवस थंडीची लाट!

हरियाणा, चंदीगड, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थान या भागात दाट धुके पसरण्याची शक्यता आयएमडीने वर्तवली आहे. गेल्या २४ तासात जम्मू-काश्मीर लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुजफ्फराबाद या भागात बर्फवृष्टी पाहायला मिळाली. दरम्यान पुढील ४८ तासात काश्मीर खोऱ्यात अनेक ठिकाणी पाऊस आणि बर्फवृष्टीची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

सध्या डेहराडूनसह मैदानी भागात दाट धुक्यापासून दिलासा मिळण्याची चिन्हे नाहीत. बद्रीनाथ धाम आणि हेमकुंड साहिबच्या पर्वतीय भागात झालेल्या हिमवृष्टीमुळे सखल भागात थंडीची लाट आली आहे. कोरडे हवामान आणि थंड वाऱ्याने संपूर्ण राज्यात कहर केला आहे. सकाळी नऊ वाजेपर्यंत धुके असून त्यामुळे हाडे गोठवणारी कडाक्याची थंडी पाहायला मिळत आहे. दहा वाजल्यापासून हलका सूर्यप्रकाश आल्याने तापमानात किंचित वाढ होताना दिसत आहे. त्यानंतर संध्याकाळ जवळ आली तसतसे थंडी पुन्हा एकदा वाढते. उत्तर भारतात पुढील दोन ते तीन दिवस दाट ते जास्त दाट धुक्याची चादर पाहायला मिळणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड, उत्तर प्रदेश, दिल्ली या भागात १७ डिसेंबरपर्यंत पहाटे आणि रात्री दाट धुक्याची चादर पाहायला मिळणार आहे.

### सामाजिक कार्यात पुढे राहणाऱ्या ..

कुणबी समाजोन्नती संघाचं मनापासून अभिनंदन.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, सरकारने समाजातील सर्व घटकासाठी चांगले निर्णय घेत आहे. सरकार हे सर्व सामान्यांचे आहे, सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी शासन काम करत आहे. ओबीसी समाजासाठी सरकारने अनेक निर्णय घेतले आहेतशासनाने इतर मागास बहुजन कल्याण विभाग सुरू केला आहे. या विभागाच्या माध्यमातून इतर मागास व अन्य समाजातील होतकरू तरुणांना, शिक्षण, स्वयंरोजगार आणि उद्योगांसाठी शासन पाठबळ देत आहे. ओबीसी समाजासाठी राज्यात ७२ वसतिगृह सुरू करण्यात येत आहेत. ओबीसी समाजाला आवश्यक सोयी सुविधा पुरवणार असून ओबीसी समाजासाठी राज्यात दहा लाख घरे बांधण्याचा निर्णय घेतला असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.शिक्षण आणि शैक्षणिक सुविधांमध्ये महाराष्ट्र पुढं आहे. त्याचं कारणही आपल्या या अशा संस्थाच आहेत.

शासनही अशा संस्थांना पाठबळ देण्यात नेहमीच पुढाकार घेत असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यात येईल. शामराव पेजे महामंडळाला अधिकाचा निधी व

परेल येथील वास्तूलाही आवश्यक निधी दिला जाईल. या बरोबरच तालुका स्तरावरील कुणबी भवन साठी आवश्यक मदत केली जाईल.उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले, कुणबी समाज हा शेतकरी आहे मुलुंड येथे उभारण्यात आलेल्या या वसतिगृहात मुंबईत शिक्षणासाठी येणाऱ्या त्यांच्या मुलांची सोय होणार आहे. शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळास अधिक निधी मिळावा. कुणबी समाजाच्या तालुकास्तरावरील कुणबी भवनसाठी निधी मिळावा, अशी मागणी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे केली.

खासदार सुनील तटकरे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

## जेऊर येथे १४०० विद्यार्थी १४०० वृक्षारोपण उपक्रमास सुरुवात



शिरवळ/हणमंत घोदे : जेऊर ता. अक्कलकोट येथे सिद्धेश्र्वर फौंडेशन आणि मेघराज राठोड फौंडेशन यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळा तसेच श्री काशिविश्र्वेश्र्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला जेऊर येथे एक विद्यार्थी एक झाड या संकल्पनेचा शुभारंभ करण्यात आला. जेऊर येथील निसर्गप्रेमी तरुण बसवराज बोरीकरजगी यांच्या पुढाकारातून सदर संकल्पना राबविण्यात आली. जिल्हा परिषद शाळेत जिल्हा परिषद माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात फौंडेशन पदाधिकारी यांनी या उपक्रमास प्रारंभी सात ते आठ फूट उंचीची ३०३ रोपे मोफत देण्याचे जाहीर केले. येत्या वर्षभरात जेऊर येथे प्रत्येक शालेय विद्यार्थी वाढदिवसाच्या निमित्ताने एक रोप भेट देऊन त्यांना लावायला लावून त्यांचे संगोपन करायला लावण्याचे निश्र्चय केला गेला.यावेळी अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.यावेळी या दोन्ही फौंडेशनचे सिद्धार्थ सर्जे, सुभाष राठोड, गुरुशांत रामपुरे,राजेंद्र बलसुरे,यशवंत हिरापुरे, अनिल सर्जे सिद्धाराम आलूरे,सिराज सलगर, सुनील सर्जे, सोमलिंग हिरेमठ तसेच शिक्षण विस्तार अधिकारी हरीश गायकवाड, केंद्रप्रमुख कृष्णात मोरे,सरपंच पार्वतीबाई झंपले, उपसरपंच काशिनाथ काका पाटील, माजी सरपंच शिवाजीराव कलमदाणे, रविकांत स्वामी, सिद्धाराम कापसे,काशिनाथ कळवंत ,प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजकुमार अमोगी,गंगाधर जमादार आणि खाजेभाई शेखजी,प्रशालेचे मुख्याध्यापक राजशेखर चौधरी,पंडित गुरव, सुभाष पाटील, सैपन मुल्ला,रफिक मुजावर,जगदेव वग्गे,गुणेश कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. येत्या पावसाळ्यात प्राथमिक व माध्यमिक असे मिळून १४०० विदयार्थ्यांसाठी १४०० वृक्षारोपण करण्याचा संकल्प सोडण्यात आला आणि फोंडेशनकडून रोपे कमी पडू न देण्याचे आश्र्वासन देखील देण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# श्रीमंत छत्रपती थोरले शाहू महाराज राज्याभिषेक सोहळा

## यवत येथे श्रीमंत श्री मालोजीराजे भोसले अक्कलकोट संस्थान यांच्या शुभहस्ते व छत्रपती शाहू महाराज यांचे सरदार वंशज यांच्या उपस्थितीत संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधीः यवत येथील श्रीमंत श्री मालोजीराजे भोसले अक्कलकोट संस्थान यांच्या शुभहस्ते व छत्रपती शाहू महाराज यांचे सरदार वंशज यांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये , श्री सुनीलराजे भोसले सुपपरगणा प्रमुख श्री अशोक राजे भोसले पाटील हिंगणीकर शाखा ,माननीय श्री अमितराजे राजेशिर्के श्रीमंत पिलाजीराजे राजेशिर्के यांचे वंशज ,माननीय श्री इंद्रजीत सिंह घोरपडे म्हाळोजी बाबा घोरपडे यांचे वंशज ,सत्यशील राजे ढमाले देशमुख श्रीमंत रामजी राऊतराव ढमाले देशमुख यांचे वंशज, श्री सिद्धार्थ दादा कंक सेनापती येसाजी कंक यांचे वंशज, माननीय श्री संतराज साठे महाराज ऐतिहासिक मराठा सरदार घराणे भीमथडी , श्री प्रवीण दादा गायकवाड इतिहास अभ्यासक व चांदखेड येथील गायकवाड घराण्याचे वंशज , श्री रवी काका भापकर , श्री विजयसिंह भापकर , श्री दारासिंह भापकर ,श्री. बाळासाहेब भापकर , लोणीभापकर येथील भापकर सरदार यांचे वंशज ,. श्रीमंत शितोळे ट्रस्टचे वतीने श्री शिवराज शितोळे देशमुख पाटस, श्री आबासाहेब गोळे सरनोबत नरवीर पिलाजी गोळे यांचे वंशज व आग्रा ते राजगड गरुड झेप चे अध्यक्ष, माननीय श्री बाबुराजे गाडे धाराऊमाता गाडे यांचे वंशज, श्री जीवनराव कवडे आर पी एफ सेवानिवृत्त सहाय्यक उपनिरीक्षक श्रीमंत आवजीराव कवडे सरदार यांचे वंशज , श्री लहूराज दरेकर –इनामदार महिमानगड किल्ल्याचे किल्लेदार श्रीमंत सरदार सयाजीराव दरेकर यांचे वंशज , महेश पवार जळगाव यांच्या उपस्थितीत पार पडला. ऐतिहासिक यवत गावचे अपरिचित असणारे सरदार घराणे दोरगे शिलेदार व श्री शाहू प्रतिष्ठान यांनी हा राज्यभिषेक सोहळा आयोजित केला होता .

अखंड हिंदुस्तान मराठ्यांच्या ताब्यात घेणारे शंभू पुत्र छत्रपती शाहू महाराज यांनी सातारा अजिंक्यतारा गडावर १२ जानेवारी १७०८ या दिवशी जिजाऊ जयंती मुहूर्त साधून स्वतःचा राज्याभिषेक सोहळा करून घेतला स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर होण्यासाठीची महत्त्वाची ऐतिहासिक घटना यादिवशी घडली. या राज्याभिषेक सोहळा नंतर मराठ्यांनी मुघलांचा मुलुख काबीज करायला सुरुवात केली छत्रपती शिवाजी महाराज यांचे अटक ते कटक तंजावर ते पेशावर असे संपूर्ण हिंदुस्तान मराठ्यांचे राज्य असावे हे स्वप्न पूर्ण होण्यास सुरुवात झाली यासाठी छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे हजारो सरदारांची व लाखो सैन्य असणारी हुजूरतीची फौज होती या फौजेचे सेनापती खंडेराव दाभाडे यांना नेमुन १७१९साली दिल्ली मोहिम हाती घेऊन दिल्ली काबीज केली व स्वतःच्या मर्जीचा बादशहा दिल्ली च्या गादीवर बसवून संपूर्ण देशातून मुघलाचे राज्य संपवले . मराठा इतिहासात असंख्य मराठा सरदार व वीरांची गाथा आहे यामध्ये विशेषता भीमथडीचा उल्लेख केला जातो अशा भीमथडीच्या यवत या गावी छत्रपती शाहू महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा अक्कलकोटचे राजा साहब मालोजीराजे भोसले यांच्या हस्ते होणे ही इतिहासाला उजळणी देणारी घटना आहे . या सोहळ्यात दोरगे शिलेदार यांचे वतीने ऐतिहासिक, सामाजिक किंवा विशेष असे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला यामध्ये गलांडवाडी एक इंदापूर तालुक्यातील श्री विठ्ठल राव शिंगटे यांचा देहू ते पंढरपूर वारीमध्ये गांजा सारख्या अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या व्यक्तींना पकडून चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन करत असतात सोबतच छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांच्या इंदापूर गढीतील समाधीवर अतिक्रमण होत असताना तिचे संवर्धन केले . आप्पासाहेब घोरपडे यांचे हर्ष फाउंडेशन मार्फत राज्यभर रक्ताची गरज असणाऱ्या रुग्णांना तातडीने रक्त उपलब्ध करून देतात. जेधे घराण्यातील पराक्रमी वीर पुरुषांचा अपरिचित इतिहास जगासमोर मांडणाऱ्या सौ श्रद्धा ताई जेधे , नगर शहरामध्ये मराठा क्रांती मोर्चा मध्ये सक्रिय असणाऱ्या तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या सौ अन्नपूर्णा ढम , महाराष्ट्रामध्ये २०१८साली पहिल्यांदाच मराठ्यांच्या शस्त्रांचे मुंबईसारख्या शहरांमध्ये प्रदर्शन भरवले तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या माननीय श्री कृष्णा दादा घाडगे , मराठा तरुणांना व्यावसायिकते बाबत मार्गदर्शन करणारे पुण्यामधील मगरपट्टा सिटी येथील प्रसिद्ध वंदन फर्निचर चे सचिन उत्तेकर बांदल पाटील, पुरंदर दौंड शिरूर अशा पुण्याच्या पूर्वेस असणाऱ्या भीम तरी च्या भागातील ऐतिहासिक गावांचे युट्युब चॅनेल मार्फत इतिहास मांडण्याचे कार्य करणाऱ्या महेंद्र नवले यांचा. सोशल मीडियावर छत्रपती शिवाजी महाराज यांचे बद्दल सविस्तर समर्पक असे लिखाण करणाऱ्या सोबतच ऐतिहासिक सरदार घराणे यांचेवर यांचे सरदारांवर लिखाण करणारे उरुळी कांचन येथील माननीय श्री खलील शेख , वंदनगडावर गड किल्ले संवर्धन करणाऱ्या गणेश बाबर यांचा तसेच या सोहळ्यास खास साताऱ्याहून येणारे महादजी शिंदे यांचे वर अलीजा बहाद्दर नावाचे पुस्तक लिहिणारे लेखक माननीय श्री पी एन शिंदे यांचा व सोहळ्यासाठी विधीवत पूजा मंत्रोच्चार तंजावर चे व्यंकोजीराजे भोसले जेजुरीच्या खंडोबाच्या पुजेसाठी नेमलेले उपाध्ये यांचे वंशज राकेश खाडे यांना आमंत्रित केले होते या सर्वाचा सन्मान राजासाहब मालोजीराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला . उपस्थित मान्यवर व सरदार वंशज यांचा सन्मान दोरगे शिलेदार यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी माननीय श्री कुंडलिक नाना खुटवड मा पंचायत समिती सदस्य दौंड , सदानंद बापू दोरगे मा.उपसरपंच यवत , गणेशभाऊ कदम जिल्हा परिषद , दौंड कॉंग्रेस अध्यक्ष विठ्ठल दोरगे प्रविण भापकर चौधरवाडी बारामती, सतीश दोरगे काळभैरवनाथ ट्रस्ट अध्यक्ष, दशरथराव दोरगे चेअरमन विविसो यवत चंद्रकांत दादा घिगे यवत ग्रामविकास वि सोसायटी सदस्य , दत्तात्रय दोरगे पाटील सामाजिक कार्यकर्ते, अण्णा साहेब दोरगे मा.चेअरमन, शिवाजी दोरगे मा. चेअरमन , दादासाहेब माने मराठा मावळा संघटना तालुकाध्यक्ष, विलास नाना दोरगे, काकासाहेब दोरगे, त्र्यंबकराव रायकर व्हाईस चेअरमन, बाळू कदम सदस्य वि का सोसायटी, पत्रकार आदेश दोरगे, पत्रकार मुळीक मामा, ज्ञानेश्र्वर दोरगे, अक्षय दोरगे, प्रविण दादा दोरगे, शरद दोरगे, सुरेश दोरगे, सुनिल आबा दोरगे ,राहुल दोरगे, मंगेश गावडे, अमर शिंगटे, शुभम दिवसे इत्यादी उपस्थित होते

छत्रपती शाहू महाराज यांचे फौजेत असंख्य मराठा सरदार तलवारीची शर्त करून पराक्रम गाजवत होते यातीलच एक सरदार म्हणजे यवत गावचे दोरगे शिलेदार होते शाहू दप्तरी दोरगे शिलेदार असा उल्लेख असलेले कागदपत्र उपलब्ध आहेत यवत या गावचा लष्करी मोकासा छत्रपती शाहू महाराज यांनी राजपुत्र फतेसिंह बाबा भोसले यांस दिला होता म्हणजेच यवत गावचे दोरगे सरदार फतेसिंह बाबा भोसले यांचे सोबत लष्करी मोहिमांमध्ये सहभागी होत होते सन १७१९ मध्ये राजपुत्र फत्तेसिंह बाबा भोसले यांचे लग्न सोहळ्यास उपस्थित असलेल्या सरदारांची यादी उपलब्ध आहे यामध्ये त्रिंबकराव दोरगे यास मानाचा फेटा व शेला देऊन सत्कार केल्याचा उल्लेख आढळतो.

# हजरत खजा गरीब नवाज रह चिस्ती (अजमेर शरीफ) येथे चादर पाठवण्यात आली



पंढरपूर/प्रतिनिधीः आज शिवरत्न बंगला येथे हजरत खाजा गरीब नवाज रह चिस्ती (अजमेर शरीफ) यांच्या ८१२व्या उरूस निमित्त महाराष्ट्र राज्याचे मा उपमुख्यमंत्री मा श्री विजयसिंह मोहिते पाटील साहेब आमदार मा श्री रणजीत सिंह मोहिते पाटील साहेब व माढा लोकसभेचे भावी खासदार मा श्री धैर्यशील मोहिते पाटील साहेब यांच्या हस्ते अजमेर शरीफ येते चादर पाठवण्यात आली यावेळी तनवीर तांबोळी सागर यादव नवीन बागवान आरिफ तांबोळी इमरान बागवान जब्बार तांबोळी अल्ताफ भाई शेख सोफियान तांबोळी अमिन तांबोळी अमर पठाण मंत्री बागवान जुबेर बागवान व मित्रपरिवार इत्यादी उपस्थित होते

# लायसन्स इंजिनियर असोसिएशन दिनदर्शिकाचे प्रकाशन




पंढरपूर/प्रतिनिधी : लायसन्स इंजिनियर असोशियन दिनदर्शिकाचे प्रकाशन पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी माननीय प्रशांत जाधव यांच्या हस्ते करण्यात आले यांप्रसंगी मुख्याधिकारी जाधव व असोसिएशन दिनदर्शिकांच्या या उपक्रमाचे कौतुक केले असोसिएशनच्या सभासदांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी केव्हाही सांगा मी तत्पर आहे असे आश्र्वासन दिले असोसिएशनच्या सर्व इंजिनिअर्सना मी वेळ देऊ शकलो नाही याबद्दल खंत व्यक्त करून त्यांनी वेळ मिळाल्यानंतर आपण सर्वजण एकत्र येऊन चर्चा करण्यात असे मानस व्यक्त केले

यांप्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष इंजिनियर सारंग कोळी यांनी माननीय मुख्य अधिकारी यांना भूपे देऊन त्यांचे स्वागत केले उपाध्यक्ष राजेंद्र आटकळे यांनी उपमुख्य अधिकारी अँड सुनील पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सचिव सोमनाथ काळे यांनी मुख्याधिकारी जाधव यांना शाल परिधान केली खजिनदार सचिव माळवदे यांनी नगरपालिका नगर अभियंता नेताजी पवार यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले या चार खिलारे यांनी यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले

प्रसंगी असोसिएशनचे सहसचिव अमित लाडे बाळ कुंभार भारत ढोबळे पांडुरंग मालवणी संतोष कचरे जिंतो बत्रा नगरपरिषदेचे कार्यकारी अधिकारी सुनील वाळुजकर नगरपरिषदेचे नगर अभियंता नेताजी पवार झिंगे व सर्व लायसन्स इंजिनीयर उपस्थित होते

# राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम



पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवस पंढरपुरात विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती उदयनराजे भोसले सेना प्रतिष्ठान संस्थापक शेखर बंटी भारत भोसले यांच्या वतीने करण्यात आले १० जानेवारी रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले होते.यावेळी प्रमुख उपस्थिती ड्रॉ बिके धोत्रे ड्रॉ संजय देशमुख ड्रॉइंग ड्रॉ महेश सुडके यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले यामध्ये ११२ रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला ११ जानेवारी रोजी या तारखेला पाळीव प्राण्यांचे आरोग्य तपासणी व लसीकरण करण्यात आले

यावेळी प्रमुख उपस्थिती चेअरमन संजय अवताडे दिनेश भोसले हे होते यामध्ये ९८ डॉग व कॅट प्रेमींनी सहवाग नोंदवला तर १२ जानेवारी रोजी सकाळी प्रतिमापूजन सौ सीमाताई परिचारक सौ साधनाताई भोसले सौ अनिता पवार सौ श्रद्धा भोसले व अनेक जिजाऊ लेकी या प्रेमींनी उपस्थित होते. तसेच प्रतिमापूजन झाल्यानंतर रांगोळी स्पर्धा राजमाता जिजाऊ जयंती मिरवणूक मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी प्रमुख उपस्थितीत नागेश भोसले नानासाहेब कदम कुलदीप पवार सिद्धार्थ गुरव गणेश निंबाळकर संदेश ढेरे संजय धोके गणेश भोसले सोपान काका देशमुख सागर कदम गणेश जाधव ओंकार चव्हाण चैतन्य क्षीरसागर माऊली कुलकर्णी श्रीपाद भादुले गौरव घाटे तुकाराम खंदारे दीपक राऊळ सचिन माने श्रीकांत कोल्हे नामदेव माने शिवराज धुमाळे आकाश पवार रोहन भोसले आदित्य जाधव आणि छत्रपती उदयनराजे भोसले सेना प्रतिष्ठान संस्थापक शेखर भारत भोसले मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सैनिक टाकळीतील दोन जीवलग मित्रांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा



सैनिक टाकळी : शिरोळ तालुका सैनिक टाकळी मध्ये दोन जीवलग मित्रांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सैनिक टाकळीचे माझी उपसरपंच संतोष गायकवाड व दैनिक यश सिध्दी न्युज चे पत्रकार संजय चव्हाण यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.त्या वेळी सैनिक टाकळीतील सर्पमित्र आमर पाटील यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.यावेळी सैनिक टाकळीतील माझी उपसरपंच सुदर्शन भोसले. संभाजी गोते.आमर पाटील.महादेव पाटील. चंद्रकांत भोसले.सोपान पाटील.शिवाजी बाबर.आनंदराव चव्हाण.मगेश पाटील.संदीप पाटील.धनाजी पाटील. प्रकाश देसाई.शशिकांत कदम.सुशांत कदम रामदास पाटील.व सैनिक टाकळीतील सर्व मित्र मंडळ या वाढदिवसाच्या वेळी उपस्थित होते.या सर्वांनी या मित्रांना दीर्घ आयुष्य लाभो ही शुभेच्छा दिल्या



# इटकुर येथे नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा


कळंब/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकुर येथे नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष आदित्य रणदिवे, लखन रणदिवे, पुरुषोत्तम शिंदे, निलेश शिंदे, कृष्णा रणदिवे, निलेश शिरसठ, यांच्या हस्ते करण्यात आली. तर वैजनाथ शिंदे व सहकाऱ्यांनी त्रिशरण पंचशील ग्रहण केले. या वेळेस पत्रकार सुधाकर रणदिवे, बाबासाहेब शिंदे, युवराज शिंदे, मंगेश शिंदे, लखन रणदिवे, नाना. लगाडे, पुष्पराज शिंदे, सुयश रणदिवे,विठ्ठल लगाडे, निलेश शिंदे, संतोष शिंदे, सौरभ शिंदे, बंडू आबा रणदिवे, प्रसेंजित शिंदे, व इतर कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते..

# विद्या मंदिर टाकळीवाडी शाळेभोवती दुर्गंधी युक्त अतिक्रमण विद्यार्थ्यांना आजार होण्याचा धोका

टाकळीवाडीः ता.शिरोळ येथील विद्या मंदीर शाळेभोवती उंकिरडे, पालापाचोळा कुजलेले शेणखत यामुळे शाळेभोवती दुर्गंधीयुक्त वातावरणाने अनेक रोग होण्याची भितीने बालक–पालकवर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. याची दखल घेऊन शिवगर्जना, शाळा व्यवस्थापन समितीने ग्रामपंचायत टाकळीवाडी यांना वारंवार लेखी दिलेली आहे. पुन्हा शिवगर्जना तरूण मंडळ व शाळा व्यवस्थापन समितीने लवकरात लवकर अतिक्रमण नाही निघाले तर परत दि.१६/०१/२०२४रोजी ग्रामपंचायत टाकळीवाडी येथे उपोषणाला बसणार आहे. असा इशारा दिला आहे. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती व शिवगर्जना तरूण मंडळ टाकळीवाडी चे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.असे माहिती निशांत गोरे,कृष्णा कोळी(माणगांवे) ,भरत सलगरे,निवास एक्संबे,पिंटू वनकोरे,दत्ता बदामे .सुधीर गोरे ,निलेश वनकोरे .यांनी दिली आहे.

# मराठबोली दिवाळी अंक स्पर्धेत गावगाथा दिवाळी अंकास प्रथम क्रमांक

सोलापूर/प्रतिनिधीः मराठबोली, पुणे संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या दिवाळी अंक स्पर्धेत गावगाथा (सोलापूर) आणि वारसा (अहमदनगर) जाई, विद्यार्थीहित अर्थहित (मुंबई) या अंकांनी प्रथम पटकाविला आहे, माणदेश वार्ता, दुर्गाच्या देशातून,गांधारी,पत्रभेट,सांराश द्वितीय क्रमांक, दर्यावर्दी,थिंक महाराष्ट्र,कलासागर,आंनदतरंग,क्रिककथा तृतीय क्रमांक व उत्तेजनार्थ सुभाषित,गोंदण,विश्र्वभ्रमंती, आघाडी,जनस्तंभ, भालचंद्र व शब्द शंकरपाळी या दिवाळी अंकाना दिलें आहे. महाराष्ट्र भरातून जवळजवळ ३०० दिवाळी अंक स्पर्धेत भाग घेतला यातून निवड करण्यात आले आहे.




२८ जानेवारी २०२४ रविवारी रोजी स्पर्धेचे पुरस्कार वितरण सोहळा साहित्यिक हेरंब परब यांच्या हस्ते मराठवाडा मित्र कॉलेज, डेक्कन पुणे येथे संपन्न होणार आहे .असे संस्थेच्या वतीने कळविले आहे.

गावगाथा दिवाळी अंकाचे दुसरे वर्ष असून पहिल्या अंकाला तब्बल पाच पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

दुसऱ्या वर्षी हि गावगाथा दिवाळी अंकाला पुन्हा तीनशे अंकातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.गावगाथा दिवाळी अंकात ग्रामीण भागातील संस्कृती रूढी परंपरा व ग्रामीण साहित्य विषेश स्थान देत आहे. ग्रामीण भागातील नवं साहित्यिकांना संधी मिळावी त्याना व्यासपीठ निर्माण करून दिला आहे.गावगाथा दिवाळी अंकाचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होतं आहे.

# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या कडून रे नगर येथील गृह प्रकल्प व कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा

**✻ पालकमंत्र्यांच्या हस्ते रेनगर येथील जलशुद्धीकरण प्रकल्पातील पाण्याचे जलपूजन ✻ बँकांनी सिबिल खराब असल्याने गृह कर्ज नाकारलेल्या २ हजार १०० लाभार्थ्यांना गृह कर्ज उपलब्ध करून दिले जाणार**

सोलापूर/प्रतिनिधीः रे नगर येथे असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ३० हजार घरकुलाचा प्रकल्प सुरू असून त्यातील पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांचे वितरण दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते करण्याचे नियोजित आहे. त्यानुसार गृहप्रकल्पातील कामाचा तसेच कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेऊन संबंधितांना मार्गदर्शक सूचना दिल्या.



यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, खासदार जय सिध्देश्र्वर महास्वामी, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल तेली-उगले, शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, रे नगर फेडरेशन चे प्रवर्तक नरसय्या आडम, अपर जिल्हाधिकारी प्रशांत ठोंबरे, रेनगरचे चेअरमन नलिनी कलबुर्गी, सचिव युसुफ शेख, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, ठेकेदार अंकुर पंदे यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, हा गृह प्रकल्प जगातील सर्वात मोठा गृह प्रकल्प असून यातून तीस हजार कुटुंबाचे घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणाऱ्या घरकुल वितरण कार्यक्रमाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही यासाठी प्रशासनाने योग्य ती दक्षता घ्यावी. कार्यक्रमाच्या ठिकाणी लाभार्थी व नागरिक यांना ने -आण करण्यासाठी रे नगर फेडरेशन यांनी योग्य नियोजन करावे. पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. घरकुल वितरणाचा कार्यक्रम शांततेत पार पडेल यासाठी सर्व शासकीय यंत्रणा व रे नगर प्रकल्पाचे संबंधित यंत्रणांनी परस्परात समन्वय ठेवून कार्यक्रम यशस्वी पार पडेल याची दक्षता घ्यावी असेही त्यांना सूचित केले.यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रे नगर येथील मॉडेल घराची पाहणी केली. त्याप्रमाणेच माननीय पंतप्रधान व माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्यासाठी तयार करण्यात येत असलेल्या हेलिपॅड च्या जागेची व तेथील कामाची पाहणी करून पोलीस यंत्रणेला आवश्यक सूचना दिल्या. या कार्यक्रमासाठी तयार करण्यात येत असलेल्या सभा ठिकाणची पाहणी करून व्यासपीठ तसेच किती नागरिक सभामंडपात बसू शकतात या अनुषंगाने माहिती घेऊन येणाऱ्या नागरिकांना येताना जागेवरच नाष्टा व पाण्याची सोय तसेच येथून जाताना फूड पॅकेट देण्याचे नियोजन करावे असेही त्यांनी सुचित केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी व विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी सर्व संबंधित यंत्रणेला कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या तयारीची माहिती दिली. पोलीस अधीक्षक श्री. सरदेशपांडे यांनी सुरक्षा व कायदा व्यवस्थेच्या दृष्टीने माहिती दिली. रे नगर प्रकल्पाचे प्रवर्तक नरसय्या आडम यांनी ही कार्यक्रमाच्या अनुषंगाने सूचना मांडल्या.

ठेकेदार अंकुर पंदे यांनी रे नगर येथील गृह प्रकल्पाचे सविस्तर माहिती दिली. हा प्रकल्प ३६५ एकर जागेवर होत असून ३० हजार घरकुले निर्माण केली जात आहेत. एका घरकुलाची किंमत पाच लाख रुपये इतकी असून ३०० चौरस फूट एवढी घरकुलाची जागा असून अडीच लाख रुपये लाभार्थी व अडीच लाख रुपये पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेले आहेत. प्रकल्पाचा एकूण खर्च १ हजार ८३१ कोटी असून यातील लाभार्थी हिस्सा ७५० कोटीचा असल्याची माहिती त्यांनी दिली. या प्रकल्पाची भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ९ जानेवारी २०१९ रोजी झालेले होते तर प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील पंधरा हजार घरकुले पूर्ण झालेली असून वितरण दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**✻पालकमंत्र्यांच्या हस्ते जलपूजन :** रे नगर येथील पाणीपुरवठा योजना पूर्ण झालेली असून येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणीपुरवठा झालेला आहे. या पाणीपुरवठा योजनेची चाचणी पूर्ण झालेली असून आज पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पाण्याचे विधीवत पूजन करण्यात आले.

**✻२१०० लाभार्थ्यांना गृह कर्ज उपलब्ध करणार :** ज्या लाभार्थ्यांचे सिबिल खराब असल्याने बँकेने गृह कर्ज प्रकरणे नामंजूर केली आहेत अशा २१०० लाभार्थ्यांना गृह कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री पाटील यांनी सांगितले. यावेळी पाणीपुरवठा योजना, अंतर्गत रस्ते, घनकचरा व्यवस्थापन, रोजगार निर्मिती, वीज पुरवठा, सोलार एनर्जी प्रकल्प, अंगणवाडी, शाळा, वाहतूक व्यवस्था या बाबींचा सविस्तर आढावा श्री. पाटील यांनी घेऊन संबंधित यंत्रणेला मार्गदर्शक सूचना दिल्या.

# स्वामीभक्त ठाकूर मामा परिवार कडून महेश इंगळेंचे औक्षण

## महेश इंगळेंच्या ५० व्या वाढदिवसाप्रित्यर्थ ५१ प्रकारच्या मिठाईची मेजवानी

अक्कलकोट/प्रतिनिधीः बदलापूरचे निस्सीम स्वामीभक्त चंद्रकांत ठाकूर उर्फ ठाकूर मामा, ठाकूर मामी परिवार यांच्या वतीने येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन ओवाळणी व औक्षण करण्यात आले. या प्रसंगी ठाकूर मामा मित्र परिवाराच्या वतीने महेश इंगळे यांना ५१ प्रकारच्या खाद्य मिठाईची मेजवानी भेट देऊन विशेष उपक्रम राबविण्यात आले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्र्वस्त महेश गोगी, स्वामीभक्त चंद्रकांत ठाकूर मामा, ठाकूर मामी, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, सोमदत्त असोलकर, विपुल जाधव, गिरीश पवार, श्रीकांत मलवे व चंद्रकांत ठाकूर मामा परिवारातील सदस्य उपस्थित होते.



# मकर संक्रांतीचे औचित्य साधून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे वाटप

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली व संकल्पनेतून मकर संक्रांतीचे औचित्य साधून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम न्यासाच्या कार्यातील एक महत्वाचे पाऊल असून, अशा विधायक उपक्रमाबद्दल सर्वत्र स्वागत व कौतुक होत आहे.

दरम्यान सदरचे वाटप प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या उपस्थितीत स्वामी भक्तांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, न्यासाचे सचिव शामराव मोरे, माजी उप नगराध्यक्ष दिलीप सिद्धे, माजी पंचायत समितीचे सदस्य बाळासाहेब मोरे, माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर, शिवराज स्वामी, मैनुद्दीन कोरबू व या उपक्रमास सहकार्य केलेले पै.महेश कुलकर्णी, महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, सरफराज शेख, सदस्य मनोज निकम, अरविंद शिंदे, अतिश पवार व मोहोळच्या माजी नगरसेविका सीमाताई पाटील, रोहित खोबरे, सौरभ मोरे, हे उपस्थित होते. गेली ३६ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे स्वामीकार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या कार्यास झळाळी प्राप्त झाली आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात. याबरोबरच समर्थ महाप्रसाद सेवे बरोबरच आता तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येणार आहे. या कीट मध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने आदि पदार्थ कुस्तीगरांसाठी श्रींचा प्रसाद रुपी खुराका असणार आहे.

तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहे. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माद्यमातून सर्वे करून तालुक्यातील ४६ पैलवानांची निवड करण्यात आली. याकामी पै.महेश कुलकर्णी, महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले. सदरचे कीट कुस्तीगरांना त्यांचा सराव सुरु असे तो पर्यंत देण्यात येणार आहे. लाभार्थी कुस्तीगरांसाठी न्यासाकडून रजिस्टर नोंदणीच्या माध्यमातून प्रती महिना कीट दिले जाणार आहे.

यासंगी बोलताना पै.महेश कुलकर्णी म्हणाले, तालुक्यात कुस्ती खेळणारे मल्लांची संख्या मोठी आहे. मात्र सराव आहे खुराक नांही. अशा अवस्थेमध्ये मल्ल असताना, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली व संकल्पनेतून मकर संक्रांतीचे औचित्य साधून तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप करण्यात आली ही बाब आम्हा कुस्तीगरांसाठी दिलासात्मक व अभिमानास्पद असून निश्र्चितच..! स्वामी रुपी प्रसादाने मल्ल घडून श्रीक्षेत्र अक्कलकोटचे नांव कोल्हापूर प्रमाणे राष्ट्रीय स्थारापर्यंत नांव पोहोचणार असल्याचे मनोगत पै.महेश कुलकर्णी यांनी व्यक्त केले. माजी उपनगराध्यक्ष दिलीप सिद्धे बोलताना म्हणाले की, अक्कलकोट शहरातील गरजू, वृद्ध, दिव्यांग, निराधार लोक आहेत, ज्यांची रोजच्या जेवणाची भ्रांत आहे, ही माहिती जेव्हा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांना समजली, तेव्हा त्यांनी त्यांच्या संकल्पनेतून दोन्ही वेळचे जेवण डब्यातून पुरविण्याचा निर्णय घेतले, त्याप्रमाणे समर्थ महाप्रसाद सेवेचा शुभारंभ दत्त जयंतीच्या दिवशी स्वामी भक्तांच्या हस्ते करण्यात आले होते. आज मकर संक्रांतीचे औचित्य साधून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे वाटप स्वामी भक्तांच्या हस्ते करण्यात आले. पैलवानासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण असून, न्यासाने घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करतो.




माजी पं.स.सदस्य बाळासाहेब मोरे म्हणाले, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने एक आगळावेगळा उपक्रम हाती घेतलेला असून, राज्यातला हा पहिलाच उपक्रम असून, कुस्तीगरांसाठी एक महत्वाचे पाऊल मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली व संकल्पनेतून उभ्या तालुक्यातील गोरगरीब, गरजू पैलवानाकरिता हा उपक्रम संजीविनी असल्याचे मोरे यांनी व्यक्त केले. यासंगी न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, धानप्पा उमदी, बाळासाहेब घाडगे, प्रथमेश पवार, निखील पाटील, प्रविण घाटगे, गोटू माने, दत्ता माने, कल्याण देशमुख, वैभव मोरे, विशाल कलबुर्गी, गोविंद शिंदे, काशिनाथ कदम, अक्षय पवार, प्रदीप बणजगोळ, दिनेश हळगोदे, सुमित कल्याणी, सिकंदर चाऊस, किरण साठे, स्वामिनाथ बाबर, विश्र्वेश्र्वरय्या स्वामी, अशोकराव जाधव, अंकुश चौगुले, शुभम कमनुळकर, महेश स्वामी, प्रविण नडगेरी, राहुल क्षीरसागर, वैभव कमनुळकर, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

हा उपक्रम तालुक्यातील गोरगरीब, गरजू पैलवानाकरिता, 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराक' सुरु करण्याच्या निर्णय श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला आहे. श्रीक्षेत्र अक्कलकोटचे नांव कुस्ती स्पर्धेत देश-विदेशात पोहोचावेत.
**-अमोलराजे भोसले ,प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त,अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट**

आमचे आधारवड : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांनी सुरु केलेला 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराक' हा उपक्रम आमच्यासाठी मोठा आधार ठरला आहे. **-पै.अमोल मणुरे, हंजगी**

महत्वाचे पाऊल : पैलावानासाठींची गरज ओळखून 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराक' तालुक्यातील गोरगरीब, गरजू पैलवानाकरिता, सुरु करण्याचा निर्णय मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व अमोलराजे भोसले यांनी घेतल्याने आम्हा पैलवाना करिता महत्वाचे पाऊल उचलण्यात आल्याने आमची मोठी सोय होत आहे,त्यामुळे आम्ही ऋणी आहोत. **-पै.सावित्री बनसोडे, सदलापूर**

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची राधे इंजिनीअरिंग सर्व्हिसेस आणि सोलुशन मध्ये निवड

वागदरी/एस.के.गायकवाड : धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय नेहमीच सतत विद्यार्थ्यांना रोजगार संबंधित संधी साठी प्रयत्नशील असते .ङ्ग त्या अनुषंगाने कॉलेजने आयोजित केलेल्या पुणे स्थित राधे इंजिनीअरिंग सर्व्हिसेस आणि सोलुशन कंपनी या कंपनीच्या कॅम्पस इंटरव्यू दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी आयोजित केले होते.कंपनीने आयोजित केलेल्या मुलाखतीत विद्यार्थी चे मेकॅनिकल विषय संबंधित ज्ञान आणि मेकॅनिकल डिझाइन संदर्भातील संगणक प्रणालीतील ऑटोकॅड यातील कौशल्य या मधून ३ विद्यार्थींची निवड केली . निवड झालेले विद्यार्थी कु. सुरज बुबने ,कु. विशाल कांबळे ,कु. श्रीगणेश पवार या तिघांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी प्राचार्य माने म्हणाले की महाविद्यालय नेहमीच विद्यार्थीच्या रोजगार संबंधित प्रयत्नशील असून येणाऱ्या काळात महाविद्यालयाने भरपूर कंपन्याचे ड्राईव्ह आयोजित केले आहे.तर राधे इंजिनीअरिंग सर्व्हिसेस आणि सोलुशन चे डायरेक्टर सचिन वाळके यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या भविष्यात कंपनी मध्ये असलेल्या इंटर्नशिप आणि रोजगार संबंधित असणाऱ्या संधी विषयी माहिती दिली . राधे इंजिनीअरिंग सर्व्हिसेस सोल्युशन्सचे मुख्यालय पिंपरी चिंचवड, औद्योगिक क्षेत्र पुणे येथे आहे.२०१२ मध्ये व्यवसायिकांच्या टीमने स्थापन केलेली राधे इंजिनीअरिंग सर्व्हिसेस अँड सोल्यूशन्स हाय-एंड कॅड / कॉम्पुटर एडेड मॅनुफॅक्टयरिंग / सीएई समर्थनाद्वारे विविध उद्योग वर्टिकल्ससाठी अत्याधुनिक सोल्यूशन्स प्रदान करते. राधे इंजिनीअरिंग सर्व्हिसेस अँड सोल्युशन्स ही भारतातील ऑटोमोटिव्ह, एरोस्पेस, कन्झ्युमर अँड मेडिकल इंजिनीअरिंग आणि हेवी अँड इंडस्ट्रियल इंजिनीअरिंग डोमेनमधील अभियांत्रिकी, पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण सेवा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आहे. तेरणा ट्रस्ट चे अध्यक्ष माननीय डॉ. पदमसिंह पाटील साहेब , संस्थेचे विश्र्वस्त माननीय आमदार राणाजगजीतसिंह पाटील,माननीय मल्हार पाटील आणि व्यवस्थापकीय समन्वयक प्रा.गणेश भातलवंडे , सर्व विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थींचे अभिनंदन केले आहे.ङ्ग या कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन ट्रैनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर अशोक जगताप , मेकॅनिकल विभागाचे प्रा. रणजित दंडनाईक यांनी केले होते.




# पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते चार हुतात्मा पुतळा परिसरातील सुशोभीकरणाचे लोकार्पण

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर शहरातील पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा व चार हुतात्मा पुतळा या सुशोभीकरणाचे कामाचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यावेळी हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, हुतात्मा श्रीकिसन सारडा,हुतात्मा जगन्नाथ शिंदे, हुतात्मा अ.कुर्बान हुसेन यांच्या पुतळ्यास व पुण्यश्र्लोक आहिल्या देवी होळकर यांच्या पुतळ्यास पालकमंत्री चंद्रकांत (दादा)पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांचे वंशज श्रीमती अन्नपूर्णा धनशेट्टी व हुतात्मा जगन्नाथ शिंदे यांचे नातू महादेव दीनानाथ शिंदे तसेच हुतात्मा कुर्बान हुसेन यांचे वंशज (मुलीचा मुलगा)हसीमोद्दीन शेख यांचा सन्मान पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नरेंद्र काळे, नगर अभियंता सारिका आकूलवार, उपअभियंता किशोर सातपुते, कनिष्ठ अभियंता परशुराम भुमकंटी, बिरू बंडगर, विजयकुमार गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

✻महापालिका इमारतीला भेट - स्मार्ट सिटी योजने अंतर्गत सोलापूर शहरातील वारसा स्थळापैकी सोलापूर महानगरपालिकेची इंद्रभुवन या इमारतीचे नुतनीकरण कामास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी इंद्रभवन इमारतीचे नूतनीकरण संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना दिली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका आकूलवार, उप अभियंता युसुफ मुजावर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

